RNI No. MAHBIL /2012/47985
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-अ–पुणे विभागीय पुरवणी

वर्ष - १०, अंक - ३१ ] शनिवार, नोव्हेंबर १३, २०२१ / कार्तिक २२, शके १९४३ [ पृष्ठे ५

**असाधारण क्रमांक ३१**

## प्राधिकृत प्रकाशन

**प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांजकडून**

**वाचा.--** (१) संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांचेकडील आदेश क्रमांक नपसु-२००१/सीआर-१-५, दिनांक १ जानेवारी २००१.

(२) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक-रानिआ/नप-२०१४/प्र. क्र. १५/का.-६, दिनांक २२ मे २०१५.

(३) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक रानिआ/नप-२०२०/प्र. क्र. १-अ/का.-६, दिनांक ६ फेब्रुवारी २०२०.

(४) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक रानिआ/नप-२०२१/प्र. क्र. ०३/का.-०६, दिनांक ९ नोव्हेंबर २०२१.

(५) जिल्हाधिकारी, सोलापूर यांचा प्रस्ताव पत्र क्रमांक २०२१/नवि-५/आरआर-४१६/२०२१, दिनांक १० नोव्हेंबर २०२१.

***आदेश***

क्रमांक नपाप्र-१/कावि-१०५७/२०२१.--ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ९ *(२)* मधील तरतुदीन्वये, तसेच संदर्भ क्रमांक ३ नुसार नागरिकांचा मागास प्रवर्ग व आरक्षणासह राखून ठेवावयाच्या महिला सदस्य संख्या, तसेच अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी राखून ठेवावयाची एकूण सदस्य संख्या सन २०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येनुसार वैराग व नातेपुते नगरपंचायतीची सदस्य संख्या निश्चित करावयाची आहे.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ७४ चे पोट-कलम *(२)* व *(३)* च्या परंतुकान्वये प्राप्त अधिकाराचा वापर करून संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांनी नगरपरिषदा/नगरपंचायतीची सदस्य संख्या निश्चित करण्याचे अधिकार प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन यांना वाचामधील संदर्भ क्रमांक १ येथील आदेशान्वये प्रदान केले आहेत.

त्याअर्थी, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ९ *(२)* व संदर्भ क्रमांक १ येथील आदेशानुसार प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून वैराग व नातेपुते नगरपंचायतीची सदस्य संख्या सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहे.

वैराग व नातेपुते नगरपंचायतीची सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये निश्चित केलेल्या सदस्य संख्येनुसार सार्वत्रिक निवडणूक घ्यावयाची आहे.

## प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे

### परिशिष्ट "अ"

### जिल्हा सोलापूर

| अ.क्र. | नगरपंचायतीचे नाव | निवडून द्यावयाची सदस्य संख्या | राखून ठेवलेल्या जागांची संख्या | | | | रकाना ७ पैकी महिलांसाठी राखून ठेवलेल्या जागेची विभागणी | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | अनुसूचित जाती-साठी | अनुसूचित जमाती-साठी | नागरिकांच्या मागास-प्रवर्गासाठी | महिला | अनुसूचित जाती-साठी (रकाना ४ पैकी) | अनुसूचित जमाती-साठी (रकाना ५ पैकी) | नागरिकांच्या मागास-प्रवर्गासाठी (रकाना ६ पैकी) | सर्वसाधारण महिला |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | वैराग | १७ | २ | ० | ५ | ९ | १ | ० | ३ | ५ |
| २ | नातेपुते | १७ | ३ | ० | ५ | ९ | २ | ० | ३ | ४ |

**सौरभ राव,**

प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त,
नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे.

पुणे, ११ नोव्हेंबर २०२१.

---

## BY THE REGIONAL DIRECTOR, MUNICIPAL ADMINISTRATION AND DIVISIONAL COMMISSIONER, PUNE DIVISION, PUNE

**Read.--** (1) Order No. Napasu-2001/C. R. -1-5, dated 1st January 2001 of Director, Municipal Admin., Mumbai.

(2) State Election Commission, Maharashtra State, Mumbai, Order No. RNA/NP-2014/CR-15/Desk-6, dated 22nd May 2015.

(3) State Election Commission, Maharashtra State, Mumbai, Order No. RNA/NP-2020/CR-1A/Desk-6, dated 6th February 2020.

(4) State Election Commission, Maharashtra State, Mumbai, Order No. RNA/NP-2021/CR-03/Desk-6, dated 9th November 2021.

(5) Collector, Solapur, Proposal No. 2021/NV-5/RR-416/2021, dated 10th November 2021.

### *Order*

No NPA-1/WS/1057/2021.–In exercise of the powers under Section 9 *(2)* of the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965 and as per order mentioned at reference No. 3 above after taking into consideration the population figures of Census of India, 2011 (including the population of Scheduled Castes, Scheduled Tribes and Other Backward Classes of Citizens), the number of Councillors to be elected and the number of seats to be reserved for Women (including the seats belonging to SC/ST/BC of Citizens) and the number of seats to be reserved for SC/ST/BC of Citizen in respect of Vairag and Natepute Nagarpanchayat, Solapur district has to be fixed.

In exercise of the powers conferred by the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965, Section 74 *(2)* and *(3)* the Director, Municipal Administration has delegated the powers to fix the number of seats in respect to Municipal Councils *vide* its letter mentioned at reference No. 1 above.

Now, Therefore, in exercise of the powers contained in sub-section *(2)* of Section 9 of the Maharashtra Municipal Councils, Nagarpanchayats and Industrial Townships Act, 1965, the Regional Director of Municipal Administration, Pune Division, Pune, hereby fixes the number of seats to be elected for Vairag and Natepute Nagarpanchayat as in Annexure "A".

The General election of Vairag and Natepute Nagarpanchayat of District Solapur for the seats mentioned in the accompanying Annexure "A" should be held as per this order.

**BY THE REGIONAL DIRECTOR, MUNICIPAL ADMINISTRATION AND DIVISIONAL COMMISSIONER, PUNE DIVISION, PUNE**

**ANNEXURE "A"**

**District Solapur**

| Sr. No. | Name of Nagar-panchayat | Total Number of Councillors to be elected | No. of Seats reserved for | | | | Out of Col. 7 seats reserved for Women | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | S. C. | S. T. | Backward Class of Citizens | Women | S.C. (out of col. 4) | S.T. (out of col. 5) | Backward Class of Citizens (out of col. 6) | General Women |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 |
| 1 | Vairag | 17 | 2 | 0 | 5 | 9 | 1 | 0 | 3 | 5 |
| 2 | Natepute | 17 | 3 | 0 | 5 | 9 | 2 | 0 | 3 | 4 |

**SAURABH RAO,**
Regional Director,
Municipal Administration
and Divisional Commissioner,
Pune Division, Pune.

Pune, 11th November 2021.

---

**विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांचेकडून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ पुणे विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध करणेत आलेल्या (खालील तक्त्यामधील रकाना क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या) नगरपंचायतींचे सदस्य संख्येचे** *शुद्धीपत्रक*

क्रमांक नपाप्र-१/कावि-१०५७/२०२१/*शुद्धीपत्रक*.--महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ पुणे विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली जिल्हा पुणेमधील देहू, सोलापूरमधील माढा व महाळुंग-श्रीपूर व सातारामधील पाटण नगरपंचायतींमधील एकूण निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या, त्याचप्रमाणे स्त्री सदस्यांची संख्या (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या इतर मागासवर्ग यांच्या सदस्य संख्येसह) आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या इतर मागासवर्गासाठी आरक्षित सदस्य संख्या निश्चित करण्यात आली होती.

परंतु, ज्याअर्थी, सन २०२१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६, दिनांक १ ऑक्टोबर २०२१ अन्वये महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मध्ये कलम ९ च्या पोट-कलम *(२)* मधील खंड *(ड)* मध्ये सुधारणा करण्यात आली आहे.

ज्याअर्थी, सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्रमांक रानिआ/नपं-२०२१/प्र. क्र. ३/का. ०६, दिनांक ९ नोव्हेंबर २०२१ अन्वये नगरपंचायतीच्या सदस्य संख्येबाबत आणि आरक्षणाबाबत शुद्धीपत्रकाद्वारे दुरुस्ती करून विभागीय आयुक्त यांस राजपत्रात प्रसिद्ध करण्याबाबत कळविलेले आहे.

त्याअर्थी, उपरोक्त नमूद जिल्हा पुणेमधील देहू, सोलापूरमधील माढा व महाळुंग-श्रीपूर व सातारामधील पाटण नगरपंचायतीच्या निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या निश्चित करणाऱ्या (खालील तक्त्यामधील रकाना क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या) देहू दिनांक ७ जानेवारी २०२१, माढा दिनांक ११ जानेवारी २०२१, महाळुंग-श्रीपूर दिनांक २० मे २०२१ व पाटण दिनांक ६ जून २०१६ रोजीच्या आदेशात खालीलप्रमाणे दुरुस्ती करणेत येत आहे.

त्यानुसार जिल्हा पुणेमधील देहू, सोलापूरमधील माढा व महाळुंग-श्रीपूर व सातारामधील पाटण नगरपंचायतीसाठी सुधारित एकूण निवडून येणाऱ्या सदस्यांची संख्या, त्याचप्रमाणे स्त्री सदस्यांची संख्या (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांच्या इतर मागासवर्ग यांच्या सदस्य संख्येसह) आणि अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांच्या इतर मागासवर्गासाठी आरक्षित सदस्य संख्या सोबतच्या तक्त्यामध्ये जोडलेनुसार दुरुस्त सदस्य संख्या निश्चित करण्यात येत आहे.

**विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे यांचेकडून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक-अ पुणे विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्ध करणेत आलेल्या (खालील तक्त्यामधील रकाना क्रमांक ४ मध्ये दर्शविलेल्या) नगरपंचायतींचे सदस्य संख्येचे** *शुद्धीपत्रक*

| | | | | | **पूर्वी राजपत्रात प्रसिद्ध केलेली संख्या** | | | | | | | | **शुद्धीपत्रकान्वये करावयाची सदस्य संख्या** | | | | | | | | टीप |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | राखून ठेवलेली सदस्य संख्या | | | | रकाना ६ पैकी स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची विभागणी | | | | राखून ठेवलेली सदस्य संख्या | | | | रकाना १४ पैकी स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांची विभागणी | | | | |
| अ. क्र. | जिल्ह्याचे नाव | नगर-पंचायतीचे नाव | महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग १-अ पुणे विभागीय पुरवणीमध्ये प्रसिद्धीचा क्रमांक व दिनांक | निवडून द्यावयाची सदस्य संख्या | स्त्रियां-साठी (५० टक्के) | अनु. जाती-साठी | अनु. जमाती-साठी | नागरि-कांच्या मागास-वर्गासाठी | अनु. जाती-साठी रकाना ७ पैकी | अनु. जमाती-साठी रकाना ८ पैकी | नागरि-कांच्या मागास-वर्गासाठी रकाना ९ पैकी | सर्व-साधारण | स्त्रियां-साठी (५० टक्के) | अनु. जाती-साठी | अनु. जमाती-साठी | नागरि-कांच्या मागास-वर्गासाठी | अनु. जाती-साठी रकाना १५ पैकी | अनु. जमाती-साठी रकाना १६ पैकी | नागरि-कांच्या मागास-वर्गासाठी रकाना १७ पैकी | सर्व-साधारण | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| १ | पुणे | देहू | क्रमांक न.पा.प्र.-१/ कावि-४७/२०२१ दिनांक ७-१-२०२१ | १७ | ९ | ३ | १ | ५ | २ | ० (*) | ३ | ४ (*) | ९ | ३ | १ | ४ | २ | ० (*) | २ | ५ (*) | **टीप.-** (*) सोडत पद्धतीने ठरविण्यात येईल, तसेच अनुसूचित जमातीसाठी सोडत निघालेस रकाना क्रमांक १९ मधील संख्या १ होऊन रकाना क्रमांक २१ मधील संख्या ४ होईल. |
| २ | सोलापूर | माढा | क्रमांक न.पा.प्र.-१/ कावि-५०/२०२१ दिनांक ११-१-२०२१ | १७ | ९ | ४ | ० | ५ | २ | ० | ३ | ४ | ९ | ४ | ० | ४ | २ | ० | २ | ५ | |
| | | महाळुंग श्रीपूर | क्रमांक न.पा.प्र.-१/ कावि-४९०/२०२१ दिनांक २०-५-२०२१ | १७ | ९ | ४ | ० | ५ | २ | ० | ३ | ४ | ९ | ४ | ० | ४ | २ | ० | २ | ५ | |

### शुद्धीपत्रक--चालू

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सातारा | पाटण | क्रमांक न.पा.प्र.-१/ कावि-२१८/२०१६, दिनांक ६-६-२०१६ | १७ | ९ | ३ | १ | ५ | २ | ० | ३ | ४ | ९ | ३ | १ | ४ | २ | ० | २ | ५ | **टीप.**-सन २०१६ साली पाटण नगरपंचायतीची पहिलीच निवडणूक असलेने अनुसूचित जमातीसाठी अनुज्ञेय असलेले १ पद सोडतीद्वारे अनुसूचित जमातीच्या महिलेसाठी आरक्षित झाले होते. विद्यमान होणाऱ्या निवडणुकीसाठी सदर पद अनुसूचित जमातीसाठी आरक्षित होणार आहे. |

**सौरभ राव,**

प्रादेशिक संचालक तथा विभागीय आयुक्त,
नगरपरिषद प्रशासन, पुणे विभाग, पुणे.

पुणे, ११ नोव्हेंबर २०२१.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.